CMYK

## आज हुतात्मा दिन



मल्लप्पा धनशेट्टी | जगन्नाथ शिंदे | अब्दुल रसूल कुर्बान हुसेन | श्रीकिसन सारडा

देशाच्या स्वातंत्र्यासाठी ब्रिटिशांकडून फाशीची शिक्षा भोगलेल्या या चार हुतात्म्यांच्या स्मृतीला सोलापूरकरांच्या वतीने त्रिवार अभिवादन...


अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | रविवार, दि. १२ जानेवारी २०२५ | वर्ष : २३ वे | अंक : १०५ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८





Lubi Pumps

ओपनवेल, मोनोब्लॉक पम्पसेट्स

गुरुगणेश एंटरप्रायजेस - सोलापूर

94235 90463 / 94235 88463


# धुमाकूळ घालणाऱ्या वाघोबाच्या मुसक्या आवळणार

## वनसंरक्षक विभागाने सोडले फर्मान : सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात होणार रवानगी

## शेतकऱ्यांनी टाकला सुटकेचा नि:श्वास

बार्शी/प्रतिनिधी

गेल्या महिनाभरापासून बार्शी तालुक्यासह धाराशिव,येडशी या भागात धुमाकूळ घालत पशुधनाचा फडशा पाडणाऱ्या वाघाच्या मुसक्या आवळून त्यांना तातडीने सह्याद्रीच्या व्याघ्र प्रकल्पात रवानगी करण्याचा आदेश शुक्रवारी वनखात्याच्या वरिष्ठ कार्यालयाकडून आला आहे.त्यामुळे रानावनात आणि वाड्या-वस्त्यांवर आलेल्या शेतकऱ्यांनी सुटकेचा नि: श्वास टाकला आहे.

सोलापूर जिल्ह्याच्या सीमावरती भागावर फिरणाऱ्या या नरवाघाला पकडून त्याला रेडिओ कॉलर लावून सह्याद्रीत व्याघ्र प्रकल्पात सोडण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. टिपेश्वर अभयारण्यातून प्रवास करुन आलेला नरवाघ गेल्या महिनाभरापासून धाराशिवसह सोलापूर सीमावरती भागात फिरतोय.त्याने अनेक पशुधनाची हत्या केली आहे. त्यामुळे वाड्या-वस्त्यांवर भीतीचे वातावरण पसरले होते.

येडशी, रामलिंग, वन्यजीव अभयारण्य, बार्शी या भागात या वाघाचा प्रामुख्याने वावर होता. मात्र गेल्या काही दिवसांपासून हा वाघ वैराग गावाच्या परिसरात वावरत आहे. सोमवारी वैराग भागात रात्री मुंगशीयार येथे दोन वासरांवर वाघाने हल्ला केला. दुसरा हल्ला राळेरास येथे गायींच्या वासरावर तर सासुर येथे म्हशीच्या रेडकावर हल्ला करून त्याला ठार केले होते.

गुरुवारी वैराग शहराजवळील सटवाईच्या माळावर शेतकरी विनायक खेंदाड यांच्या शेतात बांधलेल्या बैलाच्या पायाचा वाघाने लचका तोडला. या वाघाने आजवर १६ पशुधनाची शिकार केली. एका माणसाला जखमी देखील केला आहे. या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर वन्यजीव विभागाने या वाघाला पकडण्याचे आदेश काढण्याची शक्यता वर्तवली होती.

हे आदेश २८ फेब्रुवारीपर्यंत लागू राहणार आहेत. या संपूर्ण प्रकरणाच्या कारवाईची जबाबदारी अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक वन्यजीव पश्चिम डॉ. बेनक्लेमेंग यांना देण्यात आली आहे. अशी माहिती सूत्रांकडून मिळालेली आहे. दरम्यान तालुक्यातील नारी येथेही वाघाच्या पावलांचे ठसे आढळल्याची माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी अलका करे यांनी दिली आहे.







सोलापूर : हाच तो वाघोबा बार्शी तालुक्यातील ढेंबरेवाडीत आणि येडशी सीमेवर असलेल्या तलावाजवळ हा वाघ वनखात्याच्या कॅमेरात कैद झाला होता. वनखात्याचे अधिकारी अजूनही या परिसरात गस्त घालत आहेत.




बार्शी तालुक्यातील कारीमधील वाघाच्या पायाचे ठसे.

### अखेर भूमिका बदलली

चंद्रपूरमध्ये नुकत्याच झालेल्या वाईलकॉन २०२५ या परिषदेत वाघाला न पकडण्याचा सूर वन अधिकाऱ्यांनी आळवला होता. भारतीय वन्यजीव संस्थानचे शास्त्रज्ञ डॉ. बिलाल हबीब यांनी देखील या वाघाला पकडल्यास त्या वाघाला सह्याद्रीवर न सोडण्याच्या सूचना दिल्या होत्या. आता वन्यजीव विभागाने या वाघाला पकडण्याचे आदेश ताडोबाच्या वन्यजीव पथकाला दिले आहेत. त्याला कॉलर लावून सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात सोडावे असे म्हटले आहे.लोकांमध्ये असलेली भीती पाहून वनखात्याला आपल्या भूमिकेत बदल करावा लागला.

### अंकोली येथे पूर्वीच्या भांडणावरून मारहाण

सोलापूर : पूर्वीच्या भांडणावरून लोखंडी सळई, लाकूड,जड वस्तू आणि लाथा बुक्क्याने केलेल्या मारहाणीस ३२ वर्षीय तरुण गंभीर जखमी झाला. ही घटना अंकोली (ता.मोहोळ) येथे शनिवारी सकाळच्या सुमारास घडली. बालाजी तानाजी गव्हाणे (वय ३२ रा. अंकोली) असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. त्याला मोहोळ येथे प्राथमिक उपचार करून बेशुद्ध अवस्थेत सोलापुरातील रुग्णालयात दाखल करण्यात आले.



राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!



स्वामी विवेकानंद यांची आज जयंती

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



घोटाळा, किसी का छीप जाता है, किसी का छप जाता है!


कल्याण

390-20-370



# डोक्याला पिस्तुल लावून व्यवस्थापकाच्या घरातून लुटमार

## वाल्मिक कराडचा मुलगा सुशील विरोधात सोलापुरात तक्रार


- घरातून घुसून पैसे अन् सोन्याची लूट
- दोन ट्रक, दोन गाड्या, एक भूखंड बेकायदेशीरपणे ताब्यात
- पोलिसांकडून न्याय न मिळाल्याने ठोठावले कोर्टाचे दरवाजे
- पिता वाल्मिक याच्यानंतर सुपुत्राचे कारनामे येऊ लागले पुढे



धनंजय मुंडे



वाल्मिक कराड



सुशील कराड

सोलापूर/खास प्रतिनिधी

मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय वाल्मिक कराड प्रकरण सध्या राज्यभर प्रचंड गाजत असताना त्याचा मुलगा सुशील याच्या फसवणुकीची भानगड पुढे आली आहे. या प्रकरणी त्याच्यावर सोलापूरच्या जिल्हा व सत्र न्यायालयात खासगी फिर्याद दाखल झाली आहे. घरात जबरदस्तीने घुसून डोक्याला पिस्तुल लावून पैसे आणि सोन्याची लूट करतानाच दोन बल्क ट्रक, दोन कार आणि भूखंड ताब्यात घेण्याच्या सोलापूरच्या पिडितेच्या आरोपावरुन ही फिर्याद दाखल झाली आहे. विशेषत्वे, वाल्मिक कराडवर खुनाच्या प्रयत्नासह खंडणी, मारहाणीचेही अनेक खटले चालू आहेत. त्यासंबंधीची अनेक प्रकरणे दररोज समोर येत असतानाच, त्याचा सुपुत्र सुशील याच्याही कारनाम्याचे प्रकरण पुढे आल्याने सोलापुरात खळबळ उडाली आहे खास करुन बाब म्हणजे सुशील कराड याच्याविरुद्ध सोलापूर पोलीस आयुक्त कार्यालय आणि एमआयडीसी पोलीस ठाणे यांनी तक्रार दाखल न करुन घेतल्याने पिडितीने अखेर येथील जिल्हा व सत्र न्यायालयात तक्रार दिल्याचे म्हटले आहे.

या संदर्भात अधिक माहिती अशी, बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये मुंडेंचा निकटवर्तीय वाल्मिक सध्या पोलीस कोठडीत आहे. सीआयडीचे तपास पथक सध्या त्याची चौकशी करत आहे. वाल्मिक कराडवर खुनाच्या प्रयत्नासह खंडणी, मारहाणीचेही अनेक खटले चालू आहेत. दरम्यान, आता त्याच्या मुलावरही आरोप होत आहेत. वाल्मिक कराडचा मुलगा सुशील कराड याने ट्रेडर्स फर्मच्या जुन्या व्यवस्थापकास धमकावून मारहाण केल्याचा आरोप केला जात आहे.

यापकरणी सोलापूर येथील मुळ रहिवासी असलेल्या व्यवस्थापकच्या पिडित पत्नीने येथील जिल्हा न्यायालयात फिर्याद दाखल केली आहे. सुशील कराडने घरात घुसून पैसे व सोन्याची लूट केली. तसेच दोन ट्रक, दोन गाड्या, एक भूखंड बेकायदेशीरपणे ताब्यात घेतल्याचा आरोप आहे.यासंबंधीची तक्रार दाखल केली आहे.

व्यवस्थापकाच्या पत्नीने याबाबत सोलापुरातील एमआयडीसी पोलीस ठाणे, सोलापूर पोलीस आयुक्त व बीडच्या पोलीस अधीक्षकांकडे तक्रार दिली होती. मात्र त्याची दखल घेतली गेली नाही. त्यामुळे पीडित कुटुंबाने आता न्यायालयाचा दरवाजा ठोठावला आहे.

### उद्या न्यायालयात फैसला

यापकरणी अॅड. विनोद सूर्यवंशी म्हणाले, पोलिसांनी माझ्या आशिलांच्या तक्रारीनंतर गुन्हा दाखल केला नाही. त्यामुळे पीडित महिलेने सोलापूर जिल्हा व सत्र न्यायालयात खासगी फिर्याद दाखल केली आहे. त्यावर आरोपींनी त्यांचे म्हणणे दाखल केले असून १३ जानेवारी रोजी याबाबत सुनावणी होणार आहे. सुशील कराडवर केलेल्या आरोपांबाबत सोलापूर जिल्हा व सत्र न्यायालय काय निर्णय देते हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. या दिवशी या यापकरणाचा फैसला होऊ शकतो.

वाल्मिक कराड याच्या सुशील कराड या मुलाविरोधात सोलापूर जिल्हा व सत्र न्यायालयात खासगी फिर्याद दाखल करण्याची मागणी केली आहे. सुशीलने त्याच्या व्यवस्थापकाच्या घरात घुसून बंदूकीचा धाक दाखवून दोन बल्कर ट्रक, दोन कार, परळीतील प्लॉट व सोने बेकायदेशीरपणे ताब्यात घेतल्याचा आरोप आहे. सुशील वाल्मिक कराडसह त्याचे मित्र अनिल मुंडे व गोपी गंजेवार यांच्याविरुधातही ही खासगी फिर्याद दाखल करून घेण्याची मागणी न्यायालयाकडे करण्यात आली आहे. व्यवस्थापकाच्या घरी लूट करताना हे दोघे त्याच्याबरोबर होते.

– अॅड. विनोद सूर्यवंशी

## ११ कोटी ४० लाख रुपये कराडला पोत्यात दिले भरुन; पंढरपूरच्या दिलीप नागणेंकडून फसवणुकीचा भांडाफोड

सोलापूर/प्रतिनिधी

खंडणी, फसवूणक, मारहाण, अवैध संपत्ती अशी कित्येक प्रकरणे संशयित आरोपी परळीचा डॉन तथा मंत्री धनंजय मुंडेंचा अत्यंत निकटवर्तीय वाल्मिक कराड याची समोर येत असतानाच, राज्यातील शेतकऱ्यांना फसवल्याचे प्रकरण उजेडात आले आहे. पंढरपूर येथील शेतकरी दिलीप नागणे यांनी या प्रकरणाचा भांडाफोड केला आहे. ऊसतोड मशिनला प्रत्येक ३६ लाखांचे अनुदान देतो असे म्हणून राज्यातील १४० शेतकऱ्यांचे प्रत्येकी ८ लाख याप्रमाणे कराड यांनी घेतले, पोती भरुन मुंबईला पैसे भरुन दिले. मात्र अनुदान मिळवून तर दिलेच नाही, पण बीडला पैसे मागायला गेल्यानंतर अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करुन धमकावण्याचा 'प्रसाद' मिळाला, असे नागणे यांनी आज शनिवार (ता.११) प्रसारमाध्यमसमोर सांगितले.

दरम्यान, कराड याच्या दहशतीमुळे आम्ही शेतकऱ्यांनी आजवर झालेल्या फसवणुकीबद्दल तोंड उघडले नाही. मात्र ऊसतोड मशिनला अनुदान मिळवून देण्याच्या प्रकरणात कराड याने राज्यातील १४० शेतकऱ्यांना तब्बल ११ कोटी ४० लाखास गंडा घातल्याचा आरोप नागणेंनी केला.

दिलीप नागणे यांनी वाल्मिक कराड यांच्यावर आरोप करताना सांगितले की, कृषीमंत्री धनंजय मुंडे हे माझ्या जवळचे आहेत. ऊसतोड मशिनला प्रत्येकी ३६ लाखांचे अनुदान मिळू शकते, ते मी मिळवून देतो असे सांगितले. पैसे हे ऑनलाईन घेणार नाही, रोख स्वरुपात द्यावे, लागतील अशी अट घातली.

राज्यातील १४० शेतकऱ्यांनी ८ लाख याप्रमाणे पैसे गोळा केले. ११ कोटी ४० लाख रुपये पोत्यात भरुन पैशाची ती पोती मुंबईला पोच केल्याचे नागणे यांनी सांगितले. पैसे देऊनसुद्धा जेव्हा अनुदान मिळेना तेव्हा आम्ही वाल्मिक कराड यांच्याकडे पाठपुरावा केला. त्यादरम्यान प्रत्येकवेळी वेगवेगळी उत्तरे मिळत होती. अनुदान मिळवून देतो म्हणून दोन-तीन महिने नादी लावले.

पैसे दिलेल्या शेतकऱ्यांकडून अनुदानासंबंधी खूपच तगादा लावल्यानंतर कराड यांनी बीड्ला येण्याबद्दल संबंधित शेतकऱ्यांना निरोप दिला. ऊसतोड मशिन अनुदानाचा सोक्षमोक्ष लागेल म्हणून आम्ही तिथे गेलो असता आम्हाला अर्वाच्च भाषेत शिवीगाळ केली. शेतकऱ्यांच्या आयाबहिणींचा उद्धार करत धमकावून 'कसले पैसे, कधी दिले होते, कोणाकडे दिले होते, काय पुरावा? अशी प्रश्नांची सरबत्ती करुन अपमानास्पद वागणू देत हाकलून दिल्याचेही नागणे यांनी सांगितले.





दिलीप नागणे

- ऊसतोड मशिनला प्रत्येकी ३६ लाखांचे अनुदान मिळवून देण्याचे आमिष
- सोलापूर जिल्ह्यासह राज्यातील १४० शेतकऱ्यांना घातला गंडा

# 'लोकल बॉडी'साठी ठाकरे गटाचा स्वबळाचा नारा

सोलापूर/विशेष प्रतिनिधी

राज्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्था अर्थात लोकल बॉडीच्या निवडणुका स्वबळावर लढण्याचा निर्धार उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेकडून करण्यात आला आहे.शनिवारी नागपूरमध्ये या पक्षाचे प्रवक्ते आणि उद्धव यांचे राईटहँड असणारे संजय राऊत यांनी एकला चलोची आगाही दिली आहे.त्यामुळे महाविकास आघाडी फुटण्याच्या मार्गावर असून राऊतांच्या या भूमिकेने राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस या पक्षांमध्ये खळबळ उडाली आहे. उद्धव ठाकरे यांच्या मनात जे आहे ते राऊत बोलत असतात,असा आजपर्यंतचा अनुभवर आहे. त्यामुळे उद्धव यांचीही तीच मानसिकता असणार,असे मानले जात आहे. त्यामुळे येत्या काळात राजकिय भूकंप होण्याची चिन्हे दिसत आहेत.

मुंबईसह नागपूरपर्यंत आम्ही स्वबाळवर लढू. काय होईल ते होईल. एकदा आम्हाला ताकत आजमवायचीच आहे,असा आक्रमक पवित्रा ठाकरे गटाने घेतला आहे. नागपूरलासुद्धा आम्ही स्वबळावर लढणार आहोत. उद्धव ठाकरेंनी तसे संकेत दिले आहेत. शिवसेना शहरप्रमुखांशी आम्ही चर्चा केली. मुंबई, ठाणे, पुणे, नागपूरबाबत आमचे ठरत आहे. कार्यकर्त्यांना संधी कधी मिळणार. लोकसभा, विधानसभा निवडणुकित कार्यकर्त्यांना लढण्याची संधी मिळत नाही. त्याचा फटका पक्षाच्या वाढीला बसतो. महानगर पालिका, जिल्हा परिषदा आणि पंचायतीमध्ये स्वबळावरुन लढून आपआपले पक्ष मजबूत करावेत, असे राऊत म्हणाले. यानंतर आता महाविकास आघाडीतून संमिश्र प्रतिक्रिया येत असून,यात अजब प्रकार म्हणजे राऊतांच्या भूमिकेचे काँग्रेसकडून स्वागत करण्यात आले आहे.विधानसभा निवडणुकीत झालेल्या दारुण पराभवानंतर महाविकास आघाडीत धुसफूस सुरु झाली आहे. महाविकास आघाडीच्या नेत्यांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरु झाले आहेत. ठाकरे गट महाविकास आघाडीसोबत लढणार नसल्याची माहिती समोर आली आहे.



### आदित्यच्या हट्टापायी

शिवसेनेने (ठाकरे गट) महाविकास आघाडी तोडण्याचा घेतलेला निर्णय, हा आदित्य ठाकरे यांच्या वैयक्तिक फायद्यासाठी घेण्यात आला आहे, असा आरोप वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष अॅड. प्रकाश आंबेडकर यांनी एक्स सोशल मीडियावर ट्वीटद्वारे केला आहे. विधानसभा निवडणुकीतील पराभवामुळे महाविकास आघाडी दुभंगली असल्याचे दिसत आहे.

CMYK